advt17

# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

## १३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

-----------------

## राज्यातील कृषी विद्यापीठांतर्गत कृषी तंत्र पदविका (दोन वर्षे) / कृषी तंत्रज्ञान पदविका (Agril. Polytechnic) (तीन वर्षे) / मत्स्य अभियांत्रिकी पदविका (तीन वर्षे) अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रिया २०१७-१८

महाराष्ट्र राज्यातील महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी व डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली या चारही कृषी विद्यापीठांतर्गत सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाकरिता कृषी तंत्र पदविका, कृषी तंत्रज्ञान पदविका व मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेमार्फत राबविण्यात येत आहे.

**अभ्यासक्रम व प्रवेश पात्रता-**

| अ. क्र. | प्रवेशाचे वर्ष | अभ्यासक्रम | कालावधी | पात्रता |
|---|---|---|---|---|
| १) | पहिले | कृषी तंत्र पदविका (मराठी माध्यम) | २ वर्षे | उमेदवार महाराष्ट्रातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शालान्त परीक्षा मंडळाची माध्यमिक शालान्त परीक्षा (इ. १० वी ) किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण. |
| २) | पहिले | कृषी तंत्रज्ञान पदविका (**Agril. Polytechnic**) (अर्ध इंग्रजी माध्यम) | ३ वर्षे | |
| ३) | पहिले | मत्स्य अभियांत्रिकी पदविका (**Fishery Engineering**) (इंग्रजी माध्यम) | ३ वर्षे | माध्यमिक शालांन्त परीक्षा (इ.१० वी) किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण. |
| ४) | दुसरे | कृषी तंत्रज्ञान पदविका (**Agril. Polytechnic**) (अर्ध इंग्रजी माध्यम) | २ वर्षे | उच्च माध्यमिक शालान्त परीक्षा शास्त्र शाखा ( भौतिक शास्त्र , रसायनशास्त्र व जीवशास्त्र या विषयांसह) उत्तीर्ण. |
| ५) | तिसरे | कृषी तंत्रज्ञान पदविका (**Agril. Polytechnic**) (अर्ध इंग्रजी माध्यम) | १ वर्षे | महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठातून २ वर्षे कालावधीचा कृषी तंत्र पदविका उत्तीर्ण. |

सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाची प्रवेश प्रक्रिया मे.कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., पुणे (केटीपीएल) यांचेद्वारा 'ऑनलाईन पध्दती'ने पूर्ण करण्यात येणार आहे. यासाठी प्रवेश माहिती पुस्तिका कृषी परिषद व 'केटीपीएल' च्या अनुक्रमे **www.mcaer.org** व **www.maha-agriadmission.in** या संकेतस्थळांवर दि. २२ जून,२०१७ पासून उपलब्ध करून देण्यात येईल.

**प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी अवलंबवावयाची कार्यपध्दती-**

- उमेदवारांने **maha-agriadmission.in** या संकेतस्थळाद्वारे दि. १२ जुलै,२०१७ **पर्यंत** ऑनलाईन प्रवेश अर्ज भरावा. यानंतर प्रवेश अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध नसेल.
- 'ऑन लाईन' भरतांना उमेदवाराचे पासपोर्ट आकाराचे सध्याचे छायाचित्र, उमेदवाराची स्वाक्षरी, आवश्यक ती संबंधित मूळ कागदपत्रे स्कॅन करून संकेतस्थळावर अपलोड करावीत.

- **प्रवेश अर्ज किंवा कागदपत्रे हातबटवडयाने / टपालाने / कुरीअरने पाठवू नयेत.**
- प्रवेश अर्ज भरतेवेळी प्रवेश अर्जाचे शुल्क डेबिट कार्ड, क्रेडीट कार्ड किंवा नेट बँकीगद्वारे भरावे.

**प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी भरावयाचे शुल्क-**

खुल्या प्रवर्गासाठी रु. ४००/-

आरक्षित प्रवर्गासाठी रु. २००/- (अ.जा., अ.ज., वि.जा*, भ.ज*, इ.मा.व*, वि.मा.व*.)

[*उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र अनिवार्य.]

प्रवेश क्षमता, आरक्षण इत्यादी सविस्तर तपशिलाचा अंतर्भाव असलेली प्रवेश माहिती पुस्तिका उपरोक्त संकेतस्थळांवर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

क्र. मकृप/शिक्षण-१/२२१७/

दिनांक- ..... जून,२०१७

**महासंचालक**

महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे